# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

बी.जी.खेर प्रसूतिगृह, खेरवाडी, वांद्रे (पूर्व)

**<u>महा ई-निविदा सुचना</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी, बी.जी.खेर प्रसूतिगृह, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई हे **पश्चिम उपनगरात किचन स्थित असलेल्या, अधिकृत कंत्राटदारांकडून खालील कामासाठी महा ई-निविदा मागवत आहेत.**

| | |
|---|---|
| Name of the work | Supply of cooked food for indoor patients |
| Bid No. | 2025_MCGM_1201019_1 |
| Cost of E-Tender (Estimate Copy) | Rs. 8,10,300/- |
| Earnest Money Deposit (Rs) | Rs. 16500/- |
| Tender Fees | Rs.1452/- (+18% GST- Rs.262/-) |
| Bid start date & time | Dt.17.07.2025 at 10.00 a.m. |
| Bid end date & time | Dt.25.07.2025 at 01.00 p.m. |
| Packet A & B opening date & time | Dt.29.07.2025 at 03.00 p.m. |
| Packet C opening date & time | Dt.31.07.2025 at 03.00 p.m. |
| Last date & Time For EMD & Tender Fees | Dt.25.07.2025 at 01.00 a.m. |

**२ वेळेच्या भोजनाच्या पदार्थांचे वर्णन व परिमाण**

| **भोजनाचा प्रकार** | **भोजनाच्या पदार्थाची सुची** | **भोजनाचे परिमाण सकाळ व संध्याकाळ** | **सुरक्षा अनामत रक्कम** | **कंत्राट कालावधी** |
|---|---|---|---|---|
| थाळी पध्दत शाकाहारी | 1. भात<br>2. चपाती<br>3. डाळ<br>4. भाजी/ कडधान्य उसळ<br>5. दही<br>6.लिंबु | 1 वाटी<br>2 नग (मध्यम आकार व पातळ)<br>1 वाटी<br>1 वाटी<br>1/2 वाटी<br>1/2 नग | रु. 16500/- | कार्यादेश मिळाल्यापासून एक वर्षापर्यंत |

**सकाळच्या नाश्त्यामधील पदार्थांची सूची व परिमाण**

| **भोजनाचा प्रकार** | **नाश्त्यामधील पदार्थाची सुची** | **सकाळच्या नाश्त्याचे परिमाण** | **कंत्राट कालावधी** |
|---|---|---|---|
| सकाळचा नाश्ता | 1. पोहे/उपमा/दलिया किंवा<br>2. ढोकळा किंवा<br>3. इडली किंवा<br>4. डोसा किंवा<br>5. कडधान्यांची उसळ | १ वाटी<br>२-३ नग<br>२ नग<br>१ नग<br>१ वाटी | कार्यादेश मिळाल्यापासून एक वर्षापर्यंत |

भोजनाच्या परिमाणाबाबत वर दिल्या प्रमाणे सर्व माहिती eProcurement System Government of Maharashtra (mahatenders.gov.in) संकेतस्थळावर भरण्यात यावी. ई-निविदा संकेत स्थळावर नियत दिनापर्यंत दुपारी 01.00 वाजेपर्यंत स्विकारल्या जातील.

निविदा धारकाकडे आरोग्य खात्याचा परवाना असणे आवश्यक आहे. तसेच इतर अत्यंत आवश्यक कागदपत्रे /परवाना असणे आवश्यक आहे. निविदेसोबत रक्कम भरावयाची पावती व आरोग्य खात्याचा परवाना स्वयंपाक घर नाहरकत पत्र तसेच आयकर खात्याचा पॅन नंबरच्या सर्व छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

कोणतीही एक निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण दिल्याशिवाय फेटाळण्याचा अंतीम अधिकार वैद्यकीय अधिकारी, बी.जी.खेर प्रसूतिगृह, खेरवाडी, वांद्रे (पूर्व) यांच्याकडे राहील.

**अटी व शर्ती** -

- सुरक्षा अनामत – सुरक्षा अनामत रक्कम रु.16500/- व ई- निविदा शुल्क रु. 1452/- अधिक १८% (रु.262/-) वस्तू व सेवाकर इतक्या शुल्काचा भरणा करणे.
- भोजनाच्या परिमाणाबाबत मागे नमूद केल्याप्रमाणे सर्व माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत महाटेंडर पोर्टलवर भरण्यात यावी. महाटेंडर पोर्टलवर नियत दिनांकापर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारल्या जातील.
- **निविदा धारकाकडे** -
- निविदेसोबत भरलेल्या अनामत रकमेची पावती (E.M.D. Receipt)
- किचन चे नाहरकत प्रमाणपत्र. (KITCHEN N.O.C)
- मुख्य अग्निशमन दलाचे "ना हरकत प्रमाणपत्र"
- अन्न व औषध प्रशासन भवनाचे प्रमाणपत्र (F.S.S.)
- संस्थेचे आयकर खात्याचे पॅन कार्ड
- संस्थेचे आधार कार्ड / उद्योग आधार कार्ड
- बृहन्मुंबई महानगरपालिकेची/ खाजगी रुग्णालये अथवा प्रसुतिगृहे येथिल आंतररुग्णांना थाळी पद्धतीने अन्नपुरवठा केल्याबाबत किमान १ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.
- निविदाकारावर शासकीय अथवा निमशासकीय प्राधिकरणाद्वारे कोणत्याही प्रकारची प्रतिबंधात्मक कार्यवाही झालेली नसल्याबाबत रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- यशस्वी निविदाधारकाने त्यांच्या देयकांमध्ये वस्तु व करप्रणाली शुल्क नमूद करणे आवश्यक आहे.
- यशस्वी निविदाधारकास म.न.पा. अधिनियम १८८८ च्या कलम ७० (१अ) अन्वये लेखी करार करणे व विधी शुल्क, साधनसामुग्री आकार व करार दस्ताऐवजावर मुद्रांक शुल्क भरणे अनिवार्य राहिल.
- निविदाकाराने लेटरहेडवर संस्थेचा पत्ता, संपर्क क्रमांक व ईमेल आय डी नमूद करणे.

सर्व निविदा नियत दिनी दुपारी ०३.०० वाजता लेखा अधिकारी, एच/पूर्व विभाग यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण दिल्याशिवाय फेटाळण्याचा अंतीम अधिकार वैद्यकीय अधिकारी, बी.जी.खेर प्रसूतिगृह, खेरवाडी, वांद्रे (पूर्व) यांच्याकडे राहील.

बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त यांच्या आदेशाने
बी.जी.खेर प्रसूतिगृह, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051.

**सही,**
**वैद्यकीय अधिकारी ,**
**बी.जी.खेर प्रसूतिगृह, वांद्रे (पूर्व)**